Vol 4 Issue 9 Oct 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-9 | Oct-2014
Available online at www.isrj.org

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापक मानवतेच्या चळवळीचे प्रणेते

**प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड**
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

**सारांश :-**माणसाला माणूस म्हणावे. माणसाला माणसाप्रमाणे वागवावे. माणसाला माणुसकीचे हक्क अधिकार असावेत या शिकवणुकीतून बाबासाहेब आंबेडकराच्या कोणत्याही चळवळीला प्रारंभ झालेला दिसतो. मग तो महाडचा सत्याग्रह असो कि, नाशिकचा काळामंदिर प्रवेश सत्याग्रह व महाडचा चवदार तळ्याचा प्रसंग व येवले येथील धर्मांतरांची घोषणा या दलितांच्या इतिहांत मोठ–मोठ्या घटना आहेत.

## प्रस्तावना :-

हिंदूंचे मंदिर म्हणजे हिंदूंचा आत्मा असे म्हणतात. हिंदू ग्रंथामध्ये व मंदिरामध्ये हिंदुंचा सर्व जीव असतो. हिंदू ग्रंथ म्हणजे हिंदुंचे हृदय आत्मा असतो आणि हिंदू माणसाने त्यांचे ग्रंथ व मंदिर यांची आपल्या प्राणाने व मनाने पूजा केली आहे व करीत असतात. ग्रंथातून हिंदुना त्यांचे तत्त्वज्ञान मिळते तर मंदिरात त्याचंया भावना फुलतात, स्फुरतात, हिंदुंचे ग्रंथ व मंदिर ही हिंदुत्वाची जीवंत साक्ष असते.

डॉ. बाबासाहेबांना हे माहित होते कारण त्यांनी हिंदुमनाचा अभ्यास केला होता. संशोधन केले होते. त्यातून डॉ. बाबासाहेबांनी हिंदु ग्रंथ व मंदिरे याबाबत निष्कर्ष काढला होता आणि म्हणूनच हिंदुच्या मंदिरात प्रवेश मिळाल की, हिंदुच्या हृदयात बदल झाले असे बऱ्याच अंशी म्हणता येईल. असे 1930 साली त्यांना प्रथम वाटले होते. अर्थात देवळात देव दगडाचा असतो हे खरे पण त्यात माणसाचा भाव भक्तीचा असतो भाव आणि भक्तीतून या दगडांना देवपण आलेले असते आणि त्याच दगडावर भक्तीभावाने दगडीच का असेना मंदिर उभारलेले असते. दगडात देवपण आलेले असते आणि त्याच दगडावर भक्तीभावाने दगडीच का असेना मंदिर उभारलेले असते. दगडात देवपण आले पण हिंदूच्या हृदयात ते आले नव्हते. हिंदुंनी दगडांना देव केले आणि माणसांना दगड बनविले, हिंदुग्रंथांनी दगडधोंड्यांची, झाडा–झुडपांची, पशु–पक्षांची, प्राणी–फुलांची पूजा करावयास शिकविले. पण माणसासारख्या माणसांचीच हेटाळणी व तिरस्कार करावसाय शिकविले हिंदू ग्रंथांनीच प्रथमतः भेद निर्माण केलेत.

हिंदू मनाने मुंग्यांचा साखर घालावयास शिकविले. पण त्याचबरोबर त्यांच्या सारख्याच दिसणाऱ्या माणसांना पाण्यावाचून तडफडायला लावले.

हिंदु ग्रंथाने खरे ते खोटे ठरविले आणि सत्याचा धिक्कार करून असत्याचे पजून करण्यास सर्वांना भाग पाडले. जाचक रूढी–परंपरा, संस्कार व संस्कृती यांना खतपाणी घातले त्यामुळे सगळी सत्य प्रामाण्यता झळाळून गेली. माणसाला माणूसपण प्राप्त व्हावे यासाठीच डॉ. बाबासाहेबांचा लढा होता. याच जाणिवेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले हिंदुंच्या मंदिरात प्रवेश मिळाल्यावर हिंदुंच्या हृदयातही बदल घडेल त्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न सुटण्यासाठी एक पाऊल पुढे पडेल हीच बाबासाहेबांची समजूत होती. त्यासाठी बाबसाहेबांनी राममंदिरच का निवडले? असाही प्रश्न काहींना पडला होता.त्याचे उत्तर सोपे आहे एक तर राम हे हिंदुंचे पूज्य दैवत त्यातच रामराज्याची घोषणा प्रत्येक हिंदू माणसाच्या जिभेवरील शब्दा–शब्दातून बाहेर पडते. रामनामाच्या जपामुळे हिंदू माणसाला मोक्ष मिळतो. राम म्हणजे हिंदुंचे हृदय ! प्रत्येक हिंदुंच्या हृदयात रामाला स्थान असते. रामाबद्दल अत्याधिक पूज्यभाव असल्यामुळे रामाच्याच मंदिरात प्रवेश सत्याग्रह करावा म्हणजे बाकीच्या मंदिरांचा प्रश्न सहज सुटेल आणि त्याबरोबर हिंदू मनात यथायोग्य बदलही होईल.

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू करावा असा विचार 1929 सालापासून चालला होता. सर्वश्री भाऊराव गायकवाड, रणखांबे, दाणी, काळे आदि मंडळी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेबांचा संदेश मनात घेऊन विचार करीत होती. महाडच्या सत्याग्रहामुळे दलित जनतेत व कार्यकर्त्यात एक प्रकारचा उत्साह संचारला होता. स्वयंस्फूर्ती व स्वअस्मिता निर्माण झाली होती. माणुसकीच्या हक्काला दलित वर्ग कित्येक शतके वंचित, भुकेला होता. या सत्याग्रहामुळे त्यांच्यात नवचेतना, नव विचार जागृत झाले होते. गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्रतेच्या वातावरणात स्वैरपणा, स्वच्छंदाने वागावयास मिळावे हीच त्यांची इच्छा होती. इतर माणसांप्रमाणे आम्हांलाही का वागता येऊ नये? आम्हालाही का बरे मानवी हक्क नसावेत? असे अनेक प्रश्नांकित विचार कार्यकर्त्यांच्या बैठकीत मांडले जात. त्यावर विचार विनिमय होऊन नव्या विचारांच्या महत्त्वाकांक्षा दलितज़जनतेच्या मनात रुजत होत्या. महाड सत्याग्रहाच्या वेळी जसे दलित वर्गातील स्त्री–पुरुष बाबासाहेबांच्या हाकेला ओ देऊन धावत आली होती. तशीच काळाराम मंदिर प्रवेशाच्या वेळी देखील दलित जनता आपल्या हाकेला ओ देऊन धावत येतील याची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती.

महाड चवदार तळ्यावरील दलित वर्गान इतर मनुष्यांप्रमाणे पाणी भरण्याच्या सत्याग्रहानंतर नाशिक काळाराम मंदिर प्रवेश करून सत्याग्रह करून खऱ्या मानव्याची प्रतिष्ठापना करावयाची होती. मनुष्यप्राण्यात असलेला उच्चनीच भेद डॉ. बाबासाहेबांना लहानपणापासूनच मनात घर करून बसला होता. या भेदापायी बाबासाहेबांना सवर्णाच्या विहिरीवर पाणी प्याले म्हणून बसलेला मार, वर्गात सर्वात शेवटी बसावयास लावून, सवर्णाच्या मुलांकडून होणारी हेटाळणी, लहानपणी केस कापण्यास न्हाव्याने दिलेला नकार हे सारे कटूप्रसंग या भदो–भेदामुळे डॉ. आंबेडकरांच्या जिव्हाली लागले होते. त्यामुळे ही दुय्यम कनिष्ठत्वाची मिळणारी वागणूक जाचक अन्याय–शोषण बाबासाहेबांनी स्वतः उपभोगले होते. सोसले होते. त्यामुळे जर देवाच्या दारात सर्वच माणसे समान, सारखी असतील तर हा भेदभाव का? या भेदभावाला समूळ नष्ट करण्याचा जणू डॉ. बाबासाहेबांनी प्राणच केला होता. माझ्या असंख्य दलित बांधवाचे जिणे किती अगतिक, असहाय्य आहे आणि कितीतरी गोष्टीपासून माझे बांधव वंचित आहेत याचा विचार केल्यावर बाबासाहेब अस्वस्थ होत असत. 2 मार्च 1930 हा मंदिरप्रवेश सत्याग्रहाचा दिवस ऐतिहासिक दिवस ठरला. प्रचंड दलित जनसमुदाय यात सहभागी झाला होता. त्यात प्रामुख्याने श्री.भाऊराव कृष्णराव उफ दादासाहेब गायकवाड, बुद्धवासी पतित पावनदास, बु. तुकाराम बी. काळे, सावळराम दाणी, अमृतराव रणखांबे, बु. रंगनाथ भालेराव, बु. संभाजी रोकडे, के. बी. जाधव, बु. डी. एन. पगारे, पुंजाजी नवसाजी जाधव, बु. दिवाकर पगारे, बु. बापू शेजवळ, बु. वस्ताद रूपाजी पगारे, शंकरदास वर्षे, बु. लिंबाजी भालेराव, विठ्ठलराव रणखांबे, बापूसाहेब गायकवाड, बु.श्री. ठेंबे बापूजी खंबाळेकर, बु.सखाराम गंगाराम काळे पहिलवान(वस्ताद) रामा पाला, अप्पा गायकवाड, जी. एन. पगारे, आर. आर.दाणी इ. प्रमुख मंडळी नाशिक जिल्ह्यातील हजर होती. त्याचबरोबर बाहेरील अनेक प्रमुख मंडळी हजर होती. त्यात संगमनेरचे पी. जे. रोहम, नंदुरबारचे श्री. लळींगकर, बु. सुभेदार, बु. सुभेदार घाडगे (पुणे) त्याचप्रमाणे मुंबईचे श्री. भास्करराव कद्रेकर, श्री. देवराव नाईक, बु. डी व्ही. प्रधान, प्रा. सबनीस (नाशिक) क. गं. नी. सहस्त्रबुद्धे, श्री. शिवतकर, श्री. कवळी आदि प्रमुख मंडळी हजर होती. त्यावेळी जी सभा झाली होती त्या सभेस सत्याग्रहाचा हेतु काय आहे हे सांगण्यासाठी बाबासाहेबांनी समस्त दलित जनतेला उद्देशून अतिशय अर्थपूर्ण व विचार प्रवर्तक रित्या म्हटले होते की '''आज आपण मंदिर प्रवेश करणार आहोत.पण मंदिर प्रवेशाने तुमचे सर्वच प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही.'' आपल्या प्रश्नाचे व्यापक स्वरुप आहे, त्याचे स्वरुप राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा स्वरुपाचे आहे. पण आजचा हा आपल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आवाहन आहे. शेकडो वर्षे उच्चवर्णीय हिंदुनी आम्हाला माणुसकीच्या हक्कांपासून दूर ठेवले तेच हिंदू आपल्याला माणुसकीचे अधिकार देण्यास तयार आहेत का नाहीत? हाच एक प्रश्न या मंदिर प्रवेश सत्याग्रहातून निर्माण होणार आहे. हिंदू मन खऱ्या खुऱ्या माणसाला माणूस म्हणवायाला तयार आहे का नाही हाच प्रश्न या सत्याग्रहातून दृष्टोत्पत्तीस येणार आहे. उच्चवर्णीय हिंदुनी आपल्याला कुत्र्या मांजरापेक्षाही हीन लेखले, पण आता तेच हिंदु आपल्यासारख्या माणसांना माणुस म्हणून किंमत देणार आहेत का नाही ? ह्याच प्रश्नाचे उत्तर या सत्यग्रहातून आपल्याला मिळणार आहे हा सत्याग्रह हिंदुच्या मंदिरात बदल करण्यासाठी आहे. उच्चवर्णीय हिंदुच्या हृदयात या सत्याग्रहाने बदल घडविण्यासाठी एक प्रयत्न आहे तो यशस्वी होणे वा न होणे हे हिंदू मनोरचनेवर अवलंबून आहे.

रामाच्या मंदिरात आम्हाला प्रवेश मिळाल्याने आमचा खराखुरा प्रश्न झटपट सुटणार आहे असे मुळीच नाही. मंदिरात प्रवेश मिळाल्याने आमचा प्रश्न सुटून आमच्यात एकदम कायापालट होणार आहे असे मुळीच नाही, पण आम्ही उच्चवर्णीय हिंदू मनाची ही एक कसोटी घेत आहोत.

माणसाला माणूस म्हणून वागवावे, माणसाला माणुसकीचे अधिकार द्यावेत, मानवतेची प्रतिष्ठापना

करावी या नवयुगातील उच्चप्रेरणा हिंदुमन मानावयास तयार आहे का नाही याचीच कसोटी लागणार आहे, हेच साध्य करण्यासाठी आम्ही सत्याग्रहाचा निर्णय घेतला आहे. उच्चवर्णीय हिंदु याचा विचार करणार आहेत का नाही त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणार आहेत का नाही हा मुख्य प्रश्न आहे.

''आम्हाला माहित आहे. मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही. या मंदिरात आजपर्यंत कोट्यावधी लोकांनी येऊन देवाचे दर्शन घेतले असेल त्या दर्शनाने त्या लोकांचा मुलभूत प्रश्न सुटला आहे. असे कोण म्हणेल हे आम्ही जाणतो पण केवळ आमचा आजचा सत्याग्रह हा हिंदुच्या मनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. विशिष्ट तात्वीक भूमिकेतून आम्ही आज सत्याग्रहीचे पाऊल टाकणार आहोत.'' हे डॉ. बाबासाहेबांचे भाषण जवळजवळ तासभर चालले होत. यात सत्याग्रहाची भूमिका दलितजनतेला बाबासाहेबांनी समजावून सांगितली होती.

प्रत्यक्षात हिंदुच्या हृदयात माणुसकीचा पाझर फुटलाच नाही राममंदिराचे दरवाजे दलितांसाठी बंद झाले. सत्याग्रहींना तुरुंगात टाकण्यात आले. रामनवमीला असंख्य भाविक आले परंतु मंदिर बंद असल्यामुळे येणाऱ्या भाविकांची कोंडी झाली. यावेळी सत्याग्रहींचे नेते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गावच्या मंडळीच्या सल्ल्याने एक करार झाला व देवाचा रथ दोघांनी मिळून ओढण्याचा ठराव झाला. परंतु जरी करार झाला होता तरी सनातन्यांच्या मनात वेगळेच होते. सनातनी मंडळी कडवी होती त्यांचा द्वेष अधिकच उफाळून आला होता. सत्याग्रहींवर लाठी हल्ला करण्यात आला होता. सत्याग्रहींनी चारही दरवाजांवर धरण धरले होते. दलित वर्गातील स्त्री–पुरुष डॉ. बाबासाहेबांच्या हाकेला ''ओ'' देऊन सत्याग्रहासाठी धावून येतात याचीही प्रचिती महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी आली होती. मनुष्यप्राण्यातील उच्चनीच भेद श्रेष्ठत्व –कनिष्ठत्वाचा प्रश्नच निकाली निघावा जर देवाला सर्व सारखेच तर देवाच्या दारात हा भेदाभेद कशासाठी ? देवाच्या दारात सर्व समान म्हणून मंदिरप्रवेश हा सत्याग्रह करण्यामागचा हेतू होता. सत्याग्रहातून हेच साध्य करावयाचे होते की आम्हीही माणसे आहोत. आम्हालाही माणसासारखे जगण्याचा अधिकार आहे. माणुसकीच्या हक्कासाठी भुकलेले सर्व दलित समाज त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी दाखविलेल्या मार्गाने वाटचाल करीत होता.

2 मार्च 1930 ला पवित्र दिवस सत्याग्रहासाठी निवडला होता. परंतु सत्याग्रहाची परिणीती मंदिराचे दरवाजे बंद असल्यामुळेच झाली. शेवटी दलितांना मंदिर प्रवेश मिळालाच नव्हता. परंतु बाबासाहेब व ग्रामस्थांमध्ये करार घेऊन देवाचा रथ एका बाजूने ओढण्यासाठी मंजुरी मिळाली होती.

सत्याग्रहाचा हा सर्व भाग पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुलामगिरीच्या बेड्या तोडून मानवाची मुक्ती हवी होती. शतकानुशतके शोषित असलेल्या समाजाला न्याय मिळवून द्यायचा होता. पुढे घटनेत त्यांनी सर्वच व्यक्तींना धर्मउपासनेचा मूलभूत हक्कच देऊन टाकला होता. घटनेत त्यांनी सर्व व्यक्तींना न्याय मिळेल असे सर्व अधिकार बहाल केले होते. काळाराम मंदिर सत्याग्रह 1932 ते 1935 असा सुरु होता काळाराम मंदिर सत्याग्रह सुरू असतांनाच नाशिक जवळच्या मुखडे या गावी अस्पृश्य मंडळींनी पांडवप्रताप या ग्रंथाची दिंडी वाजतगाजत गावाच्या वाड्यातून आत नेण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी गावकऱ्यांनी अक्षरशः दलितांच्या समोर पांडवप्रताप या ग्रंथाची होळी करून दलितांच्या अंगावर जाळती लाकडे फेकली होती. बरीच दलित मंडळी त्यावेळी जखमी झाली होती. या दिंडीचे नेतृत्व करणारे दादासाबहे गायकवाड यांच्या गळ्यावर दोन इंच खोलीची जखम झाली होती आणि ते रक्तबंबाळ झाले होते. स्पृश्य गावकरी मंडळींनी त्यावेळी गांधीजीकी जय, भारत माता की जय अशा घोषणा देऊन अस्पृश्य मंडळीवर घासलेट तेलाचा डबा पेटवून जळती आगीची लाकडे फेकली होती. त्यावेळी अमृतराव रणखांबे येवल्याहून पोलीसांचा सबन्सपेक्टरचा फौजफाटा घेऊन आले होते. येवल्याचे मामलेदार वगैरे असे सर्व त्याठिकाणी आले होते. त्यावेळी रसत्त्यावरच अमृतराव रणखांबेची मोटारही घासलेट ओतून पेटविण्याचा स्पृश्य गावकरी मंडळींनी प्रयत्न केला होता. परंतु पोलीस फौजेमुळे त्यांनी तो बेत रद्द केला. (खा. दादासाहेब गायकवाड यांच्या प्रबुद्ध भारत 1958 च्या जयंती अंकात लिहिलेल्या लेखाचा उतारा)

त्यावेळी बाबासाहेब गोजमेल परिषदेसाठी लंडनला गेले होते. विशेष म्हणजे या सत्याग्रह बंदी, अत्याचाराची बातमी लंडन टाईम्समध्ये प्रसिद्ध झाली होती आणि अस्पृश्यांवरील अत्याचाराचे दर्शन आंग्लाविचारवंताना झाले होते. डॉ. बाबासाहेब व गांधी यांच्यात दलितांच्या प्रतिनिधीच्या बाबत सारखी बौद्धीक लढत चाललेली होती. त्याच ऐन घटकेला भारतीय स्पृश्य हिंदूंनी माणूसकीची होळी केली याची मुखेड सत्याग्रहाच्या उदाहरणाने प्रचिती आली होती व सत्याग्रहीवरील अन्यायाची बातमी पाहून बाबासाहेबांच्या अंगाची तात्वीक संतापाने लाही लाही झाली होती आणि त्याच द्वेषाच्या भरात त्यांनी लंडन टाईम्सची प्रत गांधीजींच्या अंगावर फेकली त्यांना सांगावयाचे होते की पहा भारतातील खेड्यांमधये अस्पृश्यांवर कसा अन्याय व जुलूम होतो. सत्य व माणूसकीचा बळी जातो आहे.

पुढचा सत्याग्रह राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी 15/07/1946 रोजी पुण्यात सुरू झाला

होता. भर पावसात दलित जनतेने तो सत्याग्रह सुरू ठेवला होता. स्वातंत्र्य युद्धात सहभागी होण्यासाठी बाबासाहेबांनी सर्वांना हाक दिली होती. तनमनधनाने सर्वच या स्वातंत्र्ययुद्धात सहभागी झाले होते. आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे त्याचबरोबर आम्हाला लोकशाही पाहिजे. गुलामगिरीच्या बेड्या आम्ही तोडणार व आपल्या भारताचा झेंडा सतत फडकवत ठेवणार. बाबासाहेबांनी असे आवाहन सर्व जनतेला केले होते. भर पावसात बाबासाहेबांनी त्यावेळी निघालेल्या सत्याग्रहींना मार्गदर्शन केले होते.

एकूणच बाबासाहेबांच्या विचारांची बैठकच मुळात स्वातंत्र्याकडे वाटचाल करणारी व गुलामगिरीच्या बेड्या तोडून मुक्तता मिळविणारी होती व बाबासाहेब जसे बोलत तसे वागतही असत. जशी उक्ती तशी कृती अशी म्हण त्यांना लागू पडत असे. पुढे बाबासाहेबांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनासमितीकडे (मसुदा समिती) घटना लेखनाचे काम करतांना भारतातील सर्व वर्गाचा तळागाळातील सर्वांचा विचार केला होता. कुणावरही अन्याय होणार नाही हीच भूमिका घटना लिहितांना बाबासाहेबांची होती. सवर्णांनी आपल्याला खूप त्रास दिला म्हणून त्यांचे अधिकार डावलावे असे बाबासाहेबांना कधीही वाटले नाही. हीच त्यांच्या मनाची व विचारांची थोरवी म्हणता येइल. न्यायासाठी लढणारे बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव मार्गदर्शक दीपस्तंभ होते असे म्हणावयास हवे.

## *संदर्भ*

1) राजेंद्र रघुवंशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रसंगिक विचार, रघुवंशी प्रकाशन, पुणे.
2) चा. भ. खैरमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर अस्पृश्यांचा उद्धारक, सुगावा प्रकाशन, पुणे 30, आवृत्ती 14 एप्रिल 1991.
3) डॉ. बी. आर जोशी, प्रा. भाग्योदय जोशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटनासमिती भाषणे भाग–1 सुगावा प्रकाशन, पुणे आवृत्ती मे 2000.
4) प्र. दा. गायकवाड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन संघर्ष, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 1996.
5) समता संगराचे समर्थ सेनानी बुद्धमकन डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखक – गुरुजी प्रकाशक अनिल मेहता, मेहता पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे प्रथमावृत्ती जून 1981
6) शा. रा. रेगे, भीमपर्व, सुगावा प्रकाशन, सुगावा मुद्रण, दत्तावाडी, पुणे, आवृत्ती 14 एप्रिल, 1991.
7) षंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात, सहित प्रकाशन पुणे, आवृत्ती 26 ऑगस्ट 1999.



***प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड***
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org